महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये
प्राप्त झालेले द्वितीय अपील

अपील क्रमांक : २८०/२०२२

अपिलार्थी – श्री. सतिश देवचंद मेश्राम

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुडेसावली, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर

प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०२.२०२४

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १९.०७.२०२१ | ०९.०८.२०२१ | १७.०८.२०२१ | ०८.०९.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.१९.०७.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "श्री. देवचंद चर्माजी मेश्राम (स. शि.) यांच्या संदर्भात सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या शैक्षणिक सत्रात वर्ग अध्यापन करीत असलेल्या वर्गांचे नियोजन केल्याचे मुख्याध्यापकांचे नोटीसची प्रत व शाळेच्या दि. ३० सप्टेंबर २०१९ च्या २०२० च्या शिक्षकाच्या माहितीच्या प्रपत्राची सत्यप्रत व शैक्षणिक सत्र २०१९-२० व २०२०-२१ या शैक्षणिक सत्रात मुख्याध्यापकाने शिक्षकांना काढलेल्या नोटीसचे सत्यप्रत मिळण्याबाबत" माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, "शाळेमध्ये उपलब्ध असलेली १७ पानांची माहिती पाठविण्यात येत आहे", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. १७.०८.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती अपूर्ण दिलेली आहे त्यामुळे अर्जदार व्यथित झाला आहे" असे कारण नमूद करून

प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०२.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "अपिलार्थीस दि. ३० सप्टेंबर, २०१९ च्या शिक्षकांची माहिती प्रपत्रामध्ये सुनावणीच्या वेळी U-DISE फॉर्ममध्ये देण्यात येत आहे", असे आदेशित करून अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दि. २८.०१.२०२२** रोजी "दि. ३० सप्टेंबर २०१९ च्या शिक्षकाच्या माहितीचे प्रपत्रातील माहिती जन माहिती अधिकाऱ्याद्वारे न दिल्यामुळे व वरील माहिती प्रथम अपिलीय अधिकाऱ्याद्वारे अस्थाव्यस्थ स्वरुपात दिल्यामुळे" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. ३१.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. २७.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, श्री. सतिश देवचंद मेश्राम ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुडेसावली, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर, श्री. सुनिल रामकृष्ण खोब्रागडे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर, श्री. वैभव खांडरे उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. संजय बट्टे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. सतिश देवचंद मेश्राम यांनी दि. १९.०७.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार उपलब्ध असलेली माहिती याआधीच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०८.०९.२०२१ रोजीच्या निर्देशान्वये देण्यात आली आहे. वरील मागितलेली माहिती ही U-DISE या प्रपत्राद्वारे शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर दरवर्षी अद्ययावत माहितीसह भरण्यात येत असून त्याची एक प्रत अपिलार्थीस याआधीच देण्यात आली आहे. वरील प्रत ही माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती या शिक्क्यासह व माहिती अधिकार कायद्याच्या लोगोसह पुनश्चः एकदा अपिलार्थीस देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

(राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर — शिक्का)

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २७.०२.२०२४**

जावक क्रमांक ----3172---------------दिनांक 24 MAY 2024--------------------------

c:\users\rma\desktop\prajakta\appeal order\27.2.2024\280-2022.docx